ईश्वरवाद—५

मागील लेखांत ईश्वराच्या अस्तित्वाविरुद्ध तीन पुरावे दिले. आतां

चौथा पुरावा. 'एलीझे रक्ल्यू' याने असा अंदाज दिला आहे कीं हल्ली जगांत अजमासें ८०० वेगवेगळे धर्म आहेत. अर्थात् जे पूर्वी होऊन गेले त्यांचा हिशोब धरलेला नाहीं. यांपैकी प्रत्येक धर्माचे मतें सत्याचा ठेवा काय तो आपल्याजवळ आहे, आणि इतर सर्व धर्म चुकीचे आहेत. अर्थात् यांपैकीं कोणता तरी एकच खरा असणें शक्य आहे आणि बाकीचे खोटे असले पाहिजेत, किंवा कदाचित् सर्वच खोटे असतील. एखादा खरा आहे की काय याचा विचार करूं.

सर्व धर्मांचा उगम एकाच प्रकारचा आहे. एखाद्याला किंवा अनेक माणसांना ईश्वराचा साक्षात्कार होतो आणि ते वेगळा धर्म काढतात. हा समान उगम लक्षांत घेण्यासारखा आहे. लोक किती भोळे असतात याचा हा एक पुरावा आहे. उदाहरणार्थ कोणताही एखादा धर्म घ्या. एखादा मनुष्य म्हणतो की मीं ईश्वर पाहिला आहे, किंवा मजजवळ तो बोलला आहे. याला शेंकडों वर्षें होऊन गेलेलीं असतात. कदाचित् त्या माणसाने थाप मारली असेल, कदाचित् तो वेडा असेल किंवा भ्रमिष्ट असेल किंवा काय, यासंबंधी मला खात्री करून घेतां येत नाहीं. इतकेंच काय पण तो कधी झाला होता की नव्हता, याचीही मला खात्री नाहीं. (ख्रिस्त खरोखर कधी झाला होता की काय याबद्दल शंका आहे. **सं.**) तो होता असें लोक म्हणतात आणि कांहीं लोकांनी त्याचे बोल एकत्र केले असेंही म्हणतात. ईश्वरानें आणि त्याच्या या प्रतिनिधीनें सांगितलेल्या गोष्टी धार्मिक परंपरेनें आपल्यापर्यंत आल्या आहेत. लोक या गोष्टी पूज्यभावाने सांगतात, परंतु त्या खऱ्या कशावरून ? पराचा कावळा होतो, सत्याला अलंकार चढतात आणि शिंगेंही फुटतात. तरी देखील या परंपरेविषयीं मी यत्किंचितही संशय घेतां नये, कारण मी

तीवर पूर्ण विश्वास टेवला नाही आणि त्याप्रमाणे वागलों नाही, तर मला जिवंत असतांनाच नव्हे तर मेल्यावर देखील भयंकर शिक्षा होईल असें मला शिकवतात. ईश्वर खरोखरच असला तर या त्याच्या प्रतिनिधीसंबंधी लोक जें बोलतात, त्यावर विश्वास ठेवायला त्याने मला भाग कां पाडावें ? त्याच्यासारखेच दुसरेही प्रतिनिधि आहेत, आणि धर्मही आहेत. तर मग ईश्वर पाहिला किंवा ऐकला म्हणणारे हे जे सर्व प्रतिनिधि आहेत, त्यांत मीं निवड कशी करावी ? सत्याचा पुरावा म्हणून लोक ईश्वरी चमत्कारांकडे बोट दाखवतात. पण हे चमत्कार देखील आपल्याला परंपरेनेच कळलेले आहेत, आणि परंपरा खोटीही असूं शकते. तसेंच चमत्कार बहुतेक सर्वच धर्मांत आहेत. तेव्हा निवड कशी करावी ? चमत्कार सर्वच खोटे असले पाहिजेत, कारण ईश्वराने केलेले नियम तो स्वतःच कसे मोडील ?

शिवाय ईश्वर एखाद्याच किंवा कांही थोड्याच लोकांना कां दिसतो ? मला किंवा सर्वांनाच कां दिसत नाही ? याचा अधिक विचार करणें जरूर आहे. समजा की सर्वशक्तिमान आणि सर्वज्ञ असा एक ईश्वर आहे, आणि लोकांना आपलें अस्तित्व समजून त्यांनी आपली पूजा करावी अशी त्याची इच्छा आहे. तर अशा ईश्वराला सर्वांनाच दर्शन देणें कांही कठिण नाहीं. असें केल्यानेच सर्व लोकांची खात्री होईल आणि कोणत्याही प्रामाणिक माणसाला त्याबद्दल शंका राहणार नाहीं. आणि तो ज्याअर्थी सर्वज्ञ आहे त्याअर्थी परंपरेमुळे सत्याचा कसा विपर्यास होतो हें त्याला माहीत असलेंच पाहिजे. तेव्हा अशा मार्गाचा अवलंब सर्वज्ञ ईश्वर करील हें संभवतच नाही. त्यापेक्षा तो सर्वांनाच आणि नेहमी दर्शन देत जाईल, कारण शंका नाहीशी करण्याचा हा एकच मार्ग आहे. यावरून हें स्पष्ट दिसतें की सर्व धर्म मनुष्याच्याच डोक्यांतून निघालेले आहेत.

येथे देखील वरीलप्रमाणेंच युक्तिवाद मांडतां येईल. या बाबतींत तीन प्रकार शक्य आहेत. १. ईश्वर आहे व मनुष्यांना आपलें ज्ञान व्हावें अशी त्याची इच्छा आहे असें मानलें, तर त्याची इच्छा सफल झाली नाही हें धर्मांच्या

अनैकत्वावरून दिसतें. यावरून ईश्वर सर्वशक्तिमान नाही आणि सर्व धर्म खोटे आहेत. २. किंवा ईश्वर आहे, पण स्वतःसंबंधी मनुष्याला ज्ञान देण्याची त्याची इच्छा नाही आणि पूजा करून घेण्याचीही इच्छा नाही, असें असेल तरी सर्व धर्म खोटेच ठरतात. कारण कोणत्याही धर्मातला ईश्वर असा नाही. किंवा ३. ईश्वर अस्तित्वांतच नाही. असें असेल तर अर्थातच सर्व धर्म खोटे ठरतात.

पांचवा पुरावा. आत्म्याच्या अनस्तित्वावरूनही हीच गोष्ट सिद्ध होते. प्रथम आत्मा म्हणजे काय याचा विचार करूं. प्राचीन काळीं जीव व आत्मा एकच समजत असत, आणि मनुष्येतर प्राण्यांनाही जीव असल्यामुळे त्यांना आत्माही असे. प्रोटेस्टंट् लोकांच्या बायबलांत असें सांगितलें आहे की मांसाबरोबर त्याचा आत्मा खाऊं नका, म्हणजे रक्त खाऊं नका (जेनेसिस ९–४).

तेवीस शतकांपूर्वी प्लेटोने लिहिलें आहे की आत्म्याचे दोन भाग असतात, एक शारीरिक आणि एक मानसिक. कांही विद्वानांचें म्हणणें होतें कीं मानसिक आत्म्याचा आकार शरीरासारखाच असतो. या काळांत लोकांचा स्वर्गावर आणि नरकावर विश्वास होताच आणि शुद्धिस्थानाविषयीं लोक बोलूं लागले होते. पण जगाच्या अंतीं ईश्वर जेव्हां सर्वांचा न्याय करील त्या वेळीं सर्व मेलेले लोक जिवंत होतील आणि न्याय झाल्यावर ते स्वर्गांत किंवा नरकांत जातील अशी समजूत होती. परंतु तरी देखील आत्मे शरीराहून वेगळे असून, शिक्षा किंवा बक्षिस त्यांना मिळणार, ही कल्पना नव्हती. नरकांतल्या हालांची कल्पना शारीरिकच होती. हें सर्व इसवी सन १००० या वर्षी होणार होतें. परंतु तें वर्ष निघून गेलें आणि जगाचा अंत झाला नाहीं, तेव्हां जगाच्या अंतावरचा ख्रिस्ती लोकांचा विश्वास हळूहळू उडाला, आणि मेल्यानंतर शुद्धिस्थानांत जायचें ही कल्पना रूढ झाली, आणि आत्मा शरीराहून वेगळा आहे हीही कल्पना आली. आत्मा स्वर्गांत किंवा नरकांत, किंवा शुद्धिस्थानांत, शरीराची वाट पहात राहतो, पण आत्मा शरीरापासून वेगळा झाला तरी तो विस्तवानें भाजतोच! आणि आत्म्याचा प्लेटोनें कल्पिलेला शारीरिक भाग अजीबात नाहींसा झाला, आत्मा अमर झाला. तो स्वर्गांत आणि नरकांत जाऊं शकतो आणि त्याला नरकांतून

काढून स्वर्गांत नेऊन सोडण्याची शक्ति भटांच्या मंत्रांत असते. फक्त त्यांना पैसे दिले म्हणजे झालें !

आतां आणखी एक प्रश्न उपस्थित झाला, की मनुष्येतर प्राण्यांचा आत्मा देखील अमर असतो की काय,आणि तो देखील स्वर्गांत व नरकांत जातो काय ? ही अडचण टाळण्याकरतां इतर प्राण्यांना आत्माच नसतो असें ठरवलें, आणि बायबलांत सांगितलेला रक्तांतला आत्मा आतां नाहीसा होऊन आतां फक्त रक्तांत जीव असतो असें मानतात, आणि यामुळेच मनुष्याला मात्र आत्मा असल्यामुळें तो आत्म्याने विचार करतो, आणि इतर प्राण्यांना तो नसल्यामुळे त्यांना विचार करतां येत नाही, त्यांना केवळ उपजतबुद्धि असते, असेंही मानूं लागले.

शास्त्रीय दृष्टीने विचार करणारांना हें उघड दिसतें की इतर प्राण्यांचा मेंदू आणि मनुष्याचा मेंदू हे एकाच जातीचे पदार्थ आहेत, आणि मनुष्याला विचारशक्ति असते तशी इतर प्राण्यांनाही थोडीबहुत असते. अर्थात् त्यांत उच्चनीच प्रती लावतां येतील आणि मनुष्य सर्वांत उच्च ठरेल, पण मनुष्याला हें उच्चत्व अलीकडे मिळालेलें आहे आणि मनुष्य वानराच्या स्थितींत होता तेव्हा इतर प्राण्यांत आणि त्याच्यांत फारच थोडा फरक होता. बुद्धीने मनुष्याच्या सर्वांत जवळचे जे प्राणी आहेत, त्यांच्यांत सुखदुःख, लोभ, क्रोध, प्रेम, द्वेष, स्मरणशक्ति, कल्पनाशक्ति, वगैरे मनुष्याचे गुण कांही प्रमाणांत दिसतात. लहान मूल बाहुलीशीं खेळतें तसेंच मांजर एकाद्या चिंधींशीं खेळतें. ती चिंधी जिवंत नाही हें मांजरालाही कळतें. यावरून कल्पनाशक्ति दिसते.

विचार करण्याचें साधन मेंदू होय, आत्मा नव्हे. इतर प्राण्यांनाही मेंदू असतो आणि तो कमी दर्जाचा असला तरी तशाच प्रकारचा असतो, आणि म्हणून त्यांना विचार करतां येतो. मेंदूला कांही कारणाने इजा झाली, धक्का पोंचला, तर विचारांत विशिष्ट प्रकारची कमतरता दिसते, किंवा शरीराच्या कांही विशिष्ट भागांच्या हालचालीवर परिणाम होतो. त्याचप्रमाणे प्रयोगशालेंत मनुष्येतर प्राण्यांच्या मेंदूच्या विशिष्ट भागांना इजा केल्यास तसेच परिणाम

कृत्रिम रीतीने करतां येतात. तेव्हा अशा रीतीने मनुष्याच्या व इतर प्राण्यांच्या मेंदूत साम्य आहे हें सिद्ध होतें. तेव्हा मनुष्य जर आत्म्याने विचार करीत असेल, तर इतर प्राण्यांनाही आत्मा आहे असें कबूल करावें लागेल, आणि इतर प्राण्यांना जर आत्मा नसेल तर मनुष्यालाही विचार करण्याकरतां आत्म्याची गरज लागत नाही.

इतर प्राण्यांना देखील आत्मा आहे असें मानल्यास अतिसूक्ष्म जंतूंनाही आत्मा आहे असें मानावें लागतें आणि त्यांच्या आत्म्यांचीही स्वर्गात किंवा नरकांत सोय लावावी लागेल, तेव्हा आत्मा नाही असेंच मानणें बरें, असा युक्तिवाद वर उल्लखिलेल्या फ्रेंच लेखकाने केलेला आहे, आणि आत्मा नसला तर ईश्वर शिक्षा किंवा बक्षिस तरी कोणाला देणार? तेव्हा ईश्वर मानण्याचाही उपयोग नाही, असें म्हटलें आहे. हा युक्तिवाद अर्थात् सदोष आहे, कारण ईश्वर सर्व शक्तिमान मानल्यावर त्याला अतिसूक्ष्म जीवांच्या आत्म्यांची सोय लावणें कठिण नाही. तेव्हा ईश्वराच्या अस्तित्वाचे विरुद्ध हा पुरावा नाही.

परंतु आत्मा हा ईश्वराइतकाच काल्पनिक आहे आणि त्याच्या अस्तित्वाबद्दल कोणताही पुरावा नाही. यासंबंधी विचार पुढील लेखांत करूं.

खोटे दागिने

—:*:—

'गी द मोपसां' वरून

लांतँ आपल्या आफिसांतल्या एका अधिकाऱ्याच्या घरीं पार्टीला गेला असतांना ती त्याला प्रथम भेटली, आणि प्रथमदर्शनींच त्याचें तिच्यावर प्रेम बसलें. तिचा बाप एका खेडेगांवांत डाक्तर असे. कांही महिन्यांपूर्वी तो मेला आणि तिची आई तिला घेऊन पॅरिसला रहायला आली; हेतु हा की तिला एखादें चांगलें स्थळ पहावें. याकरतां तिने ओळखीच्या लोकांकडे बरेंच जाणेंयेणें ठेवलें होतें. ती गरीबच होती, पण तीं दोघेंही प्रामाणिक, सरळ स्वभावाचीं माणसें होतीं.

मुलगी तर इतकी सद्‌गुणी, की अशी बायको आपल्याला मिळावी असें कोणत्याही तरुणाला वाटेल. ती अतिशय सुंदर होती, तरीपण विनयशील होती आणि तिच्या चेहऱ्यावर नेहमी स्मित असे. तें पाहून कोणालाही तिच्या पवित्र मनाची साक्ष पटत असे. जो तो तिची स्तुति करी. ही कोणाच्या नशिबीं लिहिली असेल तो मोठा भाग्याचा, असें लोक नेहमी म्हणत.

लांतँला पगार चांगला होता, तेव्हा त्याने तिला मागणी घातली आणि लवकरच त्यांचें लग्न झालें. तीं अत्यंत सुखी झालीं. ती संसार इतक्या काटकसरीने करीत असे कीं यांच्याजवळ खूप पैसे असले पाहिजेत असा लोकांना भास होई. ती नवऱ्याची अतिशय काळजी घेई, शक्य तितकें कौतुक करी, कोड पुरवी. अशा रीतीने लग्नाला सहा वर्षें झालीं तरी त्या दोघांचें प्रेम पहिल्याइतकेंच कायम होतें.

तिला नांव ठेवायला त्याला काय त्या दोनच गोष्टी सांपडल्या. एक तिला नाटकाची फार हौस होती. तिच्या बऱ्याच श्रीमंत मैत्रिणी होत्या, यामुळे त्यांना बऱ्याच वेळां नव्या नाटकांच्या पहिल्या प्रयोगाचीं तिकिटें मिळत, आणि तो आफिसांत काम करून कितीही थकलाभागलेला असला तरी त्याला तिच्याबरोबर जावें लागत असे. याला तो इतका कंटाळाला की शेवटी त्याने तिला कोणातरी ओळखीच्या बाईबरोबर जायला सांगितले. ती प्रथम ऐकेना, पण नंतर कबूल झाली आणि त्याचा त्रास चुकल्यामुळे त्याला अतिशय आनंद झाला.

दुसरा दोष म्हणजे तिला दागिने घालायची संवय लागली. तिचे कपडे पूर्वीप्रमाणेंच साधे असत, पण ती कधी कानांत मोठमोठे हिरे, गळ्यांत मोत्यांच्या माळा आणि हातांत सोन्याचे अलंकार घालूं लागली. नवरा तिला पुष्कळ वेळां म्हणे, 'तुला ज्याअर्थी खरे हिरे विकत घेण्याची ऐपत नाही, त्याअर्थी तुझ्या अंगचें सौंदर्य आणि विनय हेच तुझे दागिने असावे, आणि हेच स्त्रियांना अधिक शोभतात.' ती म्हणे 'पण मी काय करूं ? मला ते फार आवडतात. कोणाला आपला स्वभाव का बदलतां येतो ?' असें म्हणून ती आपल्या बोटांभोंवतीं

मोत्यांचे सर गुंडाळून नवऱ्याच्या समोर धरून म्हणे, 'पहा, हे खोटे आहेत असें कोणी म्हणेल ? किती छान आहेत !' नवरा म्हणे, 'छे, छे, खोट्या दागिन्यांची आवड कांही बरी नव्हे.' कधीकधी ती दोघेंच घरीं बसलीं असतांना ती दागिन्यांची पेटी काढी, एखादी माळ नवऱ्याच्या गळ्यांत घाली आणि मोठ्याने हंसे. नवऱ्याला राग आलाच तर तो तिच्या अलिंगनापुढें कसा टिकणार ?

एका हिंवाळ्याच्या रात्रीं ती नाटकाला गेली. परत येतांना थंडी झाली, दुसऱ्या दिवशीं ती खोकूं लागली, आणि आठ दिवसांत न्यूमोनिआने तिचा अंत झाला. तिच्या नवऱ्याला इतकें दुःख झालें की एका महिन्यांत त्याचे केस पांढरे झाले. तो एकसारखा रडत बसे. तिचा चेहेरा, तिचा आवाज, तिचें हंसणें, या सर्वांची गोड आठवण त्याच्या मनांतून कांही केल्या जाईना.

दुःख कालांतराने कमी होतें म्हणतात, पण त्याचे बाबतींत तें कमी होईना. ऑफिसांतले इतर लोक चालू बातम्या बोलत असले की त्याच्या डोळ्यांत पाणी येई आणि तो हुंदके देऊं लागे. पण लवकरच त्याचें लक्ष दुसरीकडे लागलें. त्याला असें आढळलें की आपला पगार आपल्याला पुरत नाही. एवढ्या पगारांत बायको इतके चांगले पदार्थ आणि उंची मद्यें कशीं पुरवीत असे याचें त्याला आश्चर्य वाटलें, पण उलगडा होईना. लागलेल्या संवयी तर सुटेनात, यामुळे त्याला हळूहळू कर्ज होत गेलें आणि एक दिवस असा आला की खिशांत बिलकुल पैसे नाहीत असें पाहून कांहीतरी विकून पैसे केले पाहिजेत असें त्याने ठरवलें. त्याच्या मनांत ताबडतोब बायकोच्या खोट्या दागिन्यांचा विचार आला. ते एवींतेवीं त्याला आवडत नव्हतेच, तेव्हा ते विकल्याने त्याला बरेंच वाटलें असतें. तेव्हा त्याने सर्वांत जड मोत्यांचा हार बाहेर काढला. तो खोटा असला तरी कारागिरी उत्तम होती, तेव्हा त्याची किंमत साधारण सहासात फ्रँक् तरी यावी असा त्याने अंदाज केला (त्या वेळची किंमत सुमारें चारपांच रुपये).

तो खिशांत टाकून तो जवाहिऱ्यांच्या दुकानांकडे निघाला. पहिल्याच दुकानांत तो शिरला. असला खोटा जिन्नस विकायला आणल्याची त्याला लाजच

वाटत होती, पण इलाज नव्हता. त्याने तो मालकाला दाखवला आणि काय किंमत येईल असें विचारलें. मालकाने तो तपासला, कारकुनाला बोलावलें, त्याच्याजवळ कांहीतरी हलक्या आवाजांत बोलला, नंतर तो टेबलावर ठेवून जरा अंतरावरून तो कसा दिसतो हें पाहूं लागला. लांतँला याचा कंटाळा आला आणि तो म्हणण्याच्या बेतांत होता की 'त्याची किंमत फारशी नाही हें मला माहीत आहे.' पण इतक्यांत मालक म्हणाला 'या हाराची किंमत बारा ते पंधरा हजार फ्रँक आहे, पण तो तुम्हाला कसा मिळाला हें समजल्याशिवाय मी तो विकत घेणार नाही.' लांतँ थक्कच झाला, आणि "आ" करून पहात राहिला. शेवटीं तो म्हणाला 'काय म्हणातां ? तुमची खात्री आहे ?' तेव्हा तो दुकानदार किंचित् विरक्ततेने म्हणाला, 'हें पहा, दुसरा कोणी जास्त देत असला तर चौकशी करा आणि कोणीं न दिले तर या माझ्याकडे. माझ्या मताने त्याची किंमत फारतर पंधरा हजार आहे.' लांतँ आश्चर्याने गुंग झाला. त्याने तो हार उचलला आणि तो दुकानाबाहेर पडला. त्याला विचार करायला वेळ पाहिजे होता. बाहेर आल्यावर तो म्हणाला 'काय मूर्ख मनुष्य आहे ! मोतीं खरें की खोटें हें देखील त्याला कळत नाही. आणि मी पंधरा हजार घेतले असते म्हणजे झाली असती की नाही त्याची फजीति ?' नंतर तो एका मोठ्या दुकानांत शिरला. तेथल्या मालकाने तो हार पाहिला मात्र. तो म्हणाला 'हा हार माझ्या ओळखीचा आहे, हा मींच विकलेला आहे.' लांतँला अधिकच आश्चर्य वाटलें. तो म्हणाला 'त्याचा किंमत काय आहे ?' मालक म्हणाला 'मी तो वीस हजाराला विकला, अठरा हजारांना परत घेईन. मात्र कायद्याप्रमाणे तो तुम्हाला कसा मिळाला हें कळलें पाहिजे.' लांतँ म्हणाला 'पण तो पहा तर नीट. मी आजपर्यंत समजत होतो की तो खोटा आहे.' मालक म्हणाला 'तुमचें नांव काय ?' 'लांतँ. मी गृहमंत्र्यांच्या आफिसांत काम करतों.' दुकानदाराने आपली चोपडी काढून पाहिली आणि म्हणाला 'हा हार २० जुलै १८७६ रोजी आपल्या पत्त्यावर मॅदॅम् लांतँ यांचे नांवावर पाठवलेला होता.' लांतँ त्याच्याकडे पहातच राहिला. दुकानदाराला वाटलें की हा कोणी बिलंदर चोर असावा.

शेवटीं तो म्हणाला ' हा हार मजजवळ २४ तास ठेवाल काय ? मी पावती देतों.' तो हार ठेवून आणि पावती घेऊन लांतँ बाहेर पडला.

याचा त्याला बिलकुल उलगडा होईना. हा हार घेण्याइतके पैसे त्याच्याजवळ कधीच नव्हते. तरमग हा आला कसा ? कोणीं बक्षिस दिला ? कोणीं दिला ? कां दिला ? तो रस्त्यांत मधेंच उभा राहून विचार करूं लागला. त्याला एकदम भयंकर संशय आला. तरमग ती.....? आणि मग ते सगळे दागिने असेच आले असले पाहिजेत ! पायाखालची जमीन हालल्याचा त्याला भास झाला आणि तो चक्कर येऊन खालीं पडला. तो जागा झाला तेव्हा एका औषधांच्या दुकानांत होता. त्याला लोकांनी उचलून तेथे नेला होता आणि त्यांनीच त्याला घरीं पोंचवला. तो एका खोलींत दार बंद करून बसला. रात्र होईपर्यंत तो रडत होता, नंतर तो निजला, पण त्याला चांगलीशी झोप आली नाही. त्याला आफिसांत जाववेना. त्याने रजेकरतां पत्र लिहिलें, आणि मग त्याला आठवण झाली की दुकानांत हार आणयला गेलें पाहिजे. एवढा हार टाकून तर देतां येत नाही ! तेव्हा तो गेला. आकाश निरभ्र होतें, सुखवस्तु लोक खिशांत हात घालून हवा खात हिंडत होते. त्याच्या मनांत विचार आला ' श्रीमंतांची चैन असते. पैशाच्या जोरावर कसलेंही दुःख विसरतां येईल. पैसे असले तर प्रवास करतां येईल, आणि दुःख विसरायला तें सर्वांत उत्तम औषध. आपल्याजवळ पैसे असते तर ?' त्याला भूक लागली, पण खिशांत पैसे नव्हते. त्याला लगेच आठवण झाली की त्या हाराची किंमत १८००० फ्रँक् आहे. केवढी रकम ! तो त्या दुकानाशी पोंचला पण आंत जायला लाज वाटूं लागली पण त्याला भूक लागली होती, तेव्हा तो अधिक विचार न करतां पळतच रस्ता ओलांडून दुकानांत शिरला. मालकाने ताबडतोब त्याला बसायला खुर्ची दिली आणि म्हणाला 'मी चौकशी केली. अजूनही तो हार विकण्याची आपली इच्छा असली तर मी सांगितलेली किंमत देतों.' त्याने 'ठीक आहे' म्हटल्याबरोबर मालकाने हजारांच्या अठरा नोटा त्याच्या हातांत ठेवल्या

आणि त्याने त्या खिशांत घातल्या. दुकानाबाहेर पडणार इतक्यांत त्याला आठवण होऊन तो म्हणाला 'मला असेच आणखीही कांही दागिने विकायचे आहेत. घ्याल का तुम्हीं ?' मालक म्हणाला 'जरूर.' त्याच्या चेहऱ्यावर मिस्किल स्मित होतें, पण लांतँने तिकडे लक्ष दिलें नाही. तो आणखी एका तासाने सगळे दागिने घेऊन आला. हिऱ्याचीं कुडीं, पंचवीस हजार फ्रँक; बांगड्या, ३५०००; आंगठ्या १६०००; वगैरे वगैरे मिळून एकंदर १४३००० फ्रँक त्याला मिळाले. दुकानदार हंसत म्हणाला 'त्यांनी सगळी मिळकत दागिन्यांतच घातलेली दिसते !' लांतँ म्हणाला 'हां, कोणी बँकेंत ठेवतें, कोणी दागिन्यांत घालतें.'

त्या दिवशीं त्याने जेवणांत आणि मद्यांत बरेच पैसे घातले. नंतर एक गाडी करून ऐटींत सर्वत्र हिंडला. इतर गाडीवाल्या लोकांना सांगायचेंच बाकी राहिलें होतें कीं 'मी पण श्रीमंत आहें, तुम्ही काय समजलां आहांत ? माझ्याजवळ दोन लाख फ्रँक आहेत.' इतक्यांत त्याला आफिसाची आठवण झाली. तो अधिकाऱ्याला भेटला आणि म्हणाला, 'मी राजीनामा द्यायला आलों आहें. मला नुकतेच तीन लाख फ्रँक मिळाले आहेत.'

नंतर एका बड्या दुकानांत तो जेवायला गेला. त्याच्या शेजारीं एक बडा मनुष्य बसला होता. त्याला त्याने अगदी विश्वासांत घेऊन सांगितलें, 'मला नुकतेच चार लाख फ्रँक मिळाले आहेत.' नंतर तो नाटकाला गेला. त्या दिवशीं त्याला कंटाळा आला नाही, आणि ती सबंध रात्र त्याने चैन करण्यांत घालवली.

आणखी सहा महिन्यांनी त्याने दुसरें लग्न केलें. ही दुसरी बायको अत्यंत सद्गुणी, पण स्वभावाने अतिशय खाष्ट होती. तिने त्याला अतोनात दुःख दिलें.

ग्रंथपरीक्षण

—:o:—

दोन मनें. लेखक, वि. स. खांडेकर; प्रकाशक, बाबूराव चिमोटे, वीणा प्रकाशन, नागपूर. पृष्ठसंख्या २६६. किंमत दोन रुपये.

ह्या कादंबरीच्या सुरवातीस श्री. खांडेकर लिहितात की "ही कादंबरी लिहितांना चित्रपटाच्या तंत्राचा मीं अंशतः अवलंब केला आहे. त्यामुळे कांहीं अभिजात टीकाकार कादंबरीचें कथानक 'स्टंट पिक्चर'ला योग्य आहे असा अभिप्राय दिल्यावांचून राहणार नाहीत." स्टंट पिक्चर म्हणजे कथानकाची ओढाताण, असंभाव्य प्रसंगांची रेलचेल, आणि अस्वाभाविक पात्रांचा भरणा, अशी जर श्री. खांडेकरांची कल्पना असेल तर हीं कादंबरी 'स्टंट पिक्चर'ला योग्य आहे असें म्हणावें लागेल.

एक श्रीमंत विवाहित बॅरिस्टर आपल्या बायकोच्या नकळत एका प्रसिद्ध व हुषार सिनेमानटीबरोबर प्रेमसंबंध ठेवतो व तिला घेऊन मजेत पुण्याला येतो. तेथें तीं दोघें क्रिकेटचा एक सामना पहावयास गेलीं असतां बॅरिस्टरमजकूर आपल्याबरोबर कॉलेजांत असलेल्या व आतां प्रोफेसर झालेल्या एका मित्राला ती सिनेमानटी आपली बायको असल्याचें छातीठोकपणें सांगतो, इतकेंच नव्हे तर त्या प्रोफेसराच्या घरीं तिच्यासह पाहुणा म्हणून उतरतो. शिवाय हे प्रोफेसर सिनेमाभक्त असूनहीं तिचें खरें स्वरूप ओळखीत नाहींत. अशा तऱ्हेचे प्रसंग श्री. खांडेकरांच्या डोक्याखेरीज इतर कोठेंतरी संभवतील काय ?

वरील प्रोफेसरांच्या डोक्यांतही अजब तत्वज्ञान पिकत असतें. एम्. ए. झाल्यावर टिळकांच्या राजकीय चळवळींत पडायची त्यांची इच्छा होती, परंतु त्यांच्या आजोबांनी हुकूम केला 'भावड्या, या टिळकांच्या नादाला लागून कोठेतरी हात पोळून घेशील. मुकाट्याने प्रोफेसर हो' (पृष्ठ १५७). पुढल्याच पानावर 'मी अत्यंत पवित्र धंदा' करीत असल्याचें हे प्रोफेसर कबूल करतात, व त्याच्या पुढच्या पानावरच तेच म्हणतात 'माणसांना दोन मनं असतात...एक पशूचं आणि एक देवाचं...या दोन्ही मनांचं बळ सारखं करून जीवन सुखानं जगणं... हें यशस्वी आयुष्याचं खरं लक्षण आहे. माझ्या आयुष्यांत तें घडलं नाही. माझं दुसरं मन दुबळं असल्यामुळे मी आजोबांना दुखवूं शकलों नाही. स्त्रीसुखाचा (लग्नाचा, श. प.) मोह आवरूं शकलों नाही.' 'गोखले, शास्त्री, देवध

यांचें अनुकरणीय उदाहरणेंही तेच प्रोफेसर पुढें देतात. आतां टिळक व गोखले दोघेही प्रोफेसर होते आणि टिळक, गोखले, शास्त्री, देवधर या चौघांनीही गृहस्थाश्रमांत राहूनच अलोट देशसेवा केली आहे. मग हे गृहस्थ प्रोफेसर झाल्याबद्दल व लग्न केल्याबद्दल इतके पस्तावतात कशाला?

अस्पृश्यतेचा या कादंबरींत बराच खल केला आह आणि त्या चळवळींत आश्रमवासी, त्यागी व शांततापिय 'सुबोध नाईक' व उसळत्या रक्ताचा आणि प्राणांच्या आहुतींनी बंधनें तोडूं इच्छिणारा 'श्री' या दोघांच्या विचारसरणींतील लढ्याचें निरूपण लेखकाने केलें आहे, आणि शेवटीं सुबोधच्या शांततापिय वृत्तीचा जय झालेला दाखवला आहे. परंतु या थोर व उदात्त सुबोधच्या तोंडीं कसे अरेरावी व अहंमन्य उद्गार घातले आहेत पहा. 'माझा शब्द हाच मोठा पुरावा आहे...शिवापूरचे सारे हरिजन माझ्या ताब्यांत आहेत...पाहूं या तिथं कसा सत्याग्रह होतो तो' (पा. १५३).

कादंबरीची नायिका आधुनिक पद्धतीची व चुणचुणीत मुलगी दाखवायचा प्रयत्न लेखकाने केला आहे व कांही अंशीं तो साधला आहे. पान ९२ वर वर तिने दु:खपर्यवसायी चित्रपट सुखपर्यवसायी कसा करतात याचें फार सुंदर वर्णन केलें आहे. "माझ्या एका चित्रांत एक बेकार हीरो शेवटी तुरुंगांत पडतो असें होतें...मालक म्हणाले 'छीः छीः पैसे देऊन असलं चित्र बघायला कुत्रा सुद्धां येणार नाही. कांहीं करून त्या तुरुंगांतल्या झाडूवाल्याचं त्या फटाकड्या हिरॉइनशीं लग्न लावून टाका.' मग मी नि कथालेखक विचार करायला बसलों... कथालेखकाने दोन बीरच्या बाटल्या उडवल्या. झालं, सुचला सीन! अगदी नवीन! धरणीकंप! त्या धरणीकंपांत तुरुंगाच्या भिंती भराभर पडून गेल्या. आमचा हीरो तिथून धांवत निघाला, तो थेट हिरॉईनच्या घरापाशीं आला. तिथंही धरणीकंप होताच! बेटा हालत्या घरांत शिरला, बंदूक उचलून घ्यावी तशी त्याने हिरॉइनला खांद्यावर टाकली....."

'दोन मनें' या कादंबरीतील बराचसा भागही अशाच तऱ्हेची जुळवा-जुळव करून रचलेला असावा असें वाटतें.

शकुंतला परांजपे

पुणेकरांची बदनामी

येथील हेमंतव्याख्यानमालेंत जानेवारी २६ तारखेला श्री. शकुंतलाबाई परांजपे यांचे व्याख्यानाचे वेळीं २८ जानेवारीच्या 'कर्मवीर' साप्ताहिकाचें एक पान दरवाजावर वांटण्यांत आलें. हा उपद्व्याप एवढ्याकरतांच की त्यांतील मुख्य लेख 'शकुन्तलाबाईंचा नवा उद्योग' या मथळ्याचा असून त्यांत शकुंतलाबाईंना नांवें ठेवून पुणेकरांचीही बदनामी करण्याची संधि साधून घेतलेली आहे, आणि शिवाय अशी बदनामी करण्याचा आरोप आपल्यावर येऊं नये म्हणून लेखकानेच उलट बोंब मारली आहे की शकुंतलाबाई पुणेकरांची बदनामी करतात! हा सर्व लेख समाजस्वास्थ्यांतील 'पुणेकरांची सोय' या अर्धपानी जाहिरातीवर आधारलेला आहे. शकुंतलाबाई पुणें येथे आपल्या घरीं स्त्रियांना संततिनियमनाची संपूर्ण माहिती व योग्य आकाराच्या रबरी टोप्यांची निवड करून देतील, असें त्यांत लिहिलें असल्यामुळे, पुणें येथील स्त्रियांना संततिनियमनाची जरूर भासते (संततिनियमनाला हे लेखक 'स्वैराचार' म्हणतात पण हें त्यांचें केवळ अज्ञान किंवा शिवराळपणा आहे) असा अर्थ त्यांत ध्वनित झाल्यामुळे पुणेकरांची बदनामी होते, असें त्यांचें म्हणणें आहे. हें साप्ताहिक नवीनच निघालें आहे, तें किती अडाणी आहे याची यावरून वाचकांना कल्पना येईल. या लेखांत या विधानाच्या समर्थनार्थ दुसरीं अनेक खोटीं विधानें केलेलीं आहेत. उदा० 'हिंदु संस्कृतीला स्वैराचार किंवा कृत्रिम उपायांचे द्वारा केलेलें संततिनियमन मान्य नाही, आणि पुण्यांत हिंदुत्वाभिमानी लोकांचा भरणा अजूनहि मोठा आहे. एवढेंच नव्हे तर नवीन पिढींत तो वाढत आहे.

नवी पिढी सुद्धां स्वैराचाराच्या विरुद्ध आहे.' हीं सर्व विधानें खोटीं आणि विसंगत आहेत. ज्याप्रमाणें " गाढव किंवा 'कर्मवीर' मधील लेखक " असें म्हटल्याने 'कर्मवीर' चे सर्वच लेखक गाढव ठरत नाहीत, त्याचप्रमाणे 'स्वैराचार किंवा कृत्रिम उपायांचे द्वारा केलेलें संततिनियमन' या शब्दप्रयोगाने तो स्वैराचार ठरत नाही. पुढच्या वाक्यांत 'भरणा अजूनही मोठा आहे' असें म्हटल्यामुळें तो हळूहळू कमी होत आहे हा लेखकाच्या मनांतील विचार नकळत बाहेर पडला आहे. त्याला आणखी एक खोटें विधान जोडलें आहे की नवीन पिढींत तो वाढत आहे. मग 'अजूनही' लिहिण्याचें प्रयोजन काय? आणि पुण्यांतील जुन्या पिढीलाच काय, पण नवीन पिढीला देखील संततिनियमनाचें महत्व कळत नाही असें म्हणण्यानेच पुणेकरांची बदनामी होत नाही काय? 'हिंदु संस्कृति' याला कांही अर्थच नसतो, तेव्हा वाटेल त्याने त्याचा वाटेल तो अर्थ करावा. कृत्रिम उपायांसंबंधी माहिती देणारे बृहद्योगतरंगिणींतील आणि इतर संस्कृत ग्रंथांतील श्लोक आमचे 'संततिनियमन' पुस्तकांत दिलेले आहेत, तेव्हा ते हिंदु संस्कृतीला धरून नाहीत म्हणणें हेंच ढोंग आहे, आणि नवीन पिढीही तितकीच मूर्ख आहे हें आणखी एक ढोंग आहे. या सर्वांचा स्वराज्याशीं संबंध जोडला आहे, हे एक तिसरें ढोंग आहे. कोणीं खादी टोपी घातली म्हणजेच तो स्वराज्याचा पुरस्कर्ता झाला, हें जसें कांग्रेसचें ढोंग, तसेंच जें आपणांस पसंत नसेल तें स्वराज्याच्या विरुद्ध आहे असें म्हणणें, हें सनातन्यांचें ढोंग. स्वराज्याच्या पुरस्कारांत आम्ही कोणासही हार जाणार नाही, पण त्याकरतां खादी टोपी घालावी लागते, किंवा संततिनियमन सोडून द्यावें लागतें, हें ढोंग मात्र आम्ही ऐकणार नाही.

शकुंतलाबाईंनी हा नवीन उद्योग सुरू केल्याने पुणेकरांची सोय झाली आहे की नाही, याची साक्ष पुण्यांतील स्त्रियांनीच त्यांच्याकडे सल्ल्याकरतां गर्दी करून दिली आहे. कोणतीही सोय केली म्हणजे ती बहुसंख्य लोकांचीच सोय असली पाहिजे असें नाही. एखाद्यानें दाढी करण्याची सोय केली, तर बायकांना

दाढीच नसते आणि लहान मुलांनाही नसते, त्याचप्रमाणे कांही लोक दाढी वाढवतात, तेव्हा ती बहुसंख्य लोकांची सोय होत नाही, म्हणून ती सोयच नव्हे असें म्हणतां येणार नाही. किंवा बायकांना सुद्धां दाढी असते असें अनुमानही त्यावरून काढतां येणार नाही ! गोमांस विकण्याचें उदाहरण लेखकाने दिलें आहे, तीही अशीच गोष्ट आहे. जे गोमांस खात असतील त्यांचीच ती सोय होईल, ज्यांना नको असेल ते खाणार नाहीत. त्यांत एखादा वैदिक ब्राह्मण खाणाराही भेटेल; जैनांना शरण गेलेल्या, सनातनी म्हणवणाऱ्या ब्राह्मणांनीच गोमांस खाल्लें पाहिजे असा कोणी आग्रह धरणार नाही. पण वेदकालीन ब्राह्मण अधिक पुरातन असल्यामुळे सनातनी पद्धतीप्रमाणें वास्तविक त्यांचीच रीत अधिक पूज्य मानली पाहिजे. पण सनातनी लोकांत सुसंगत विचार करण्याची ताकत नसेल तर त्यांनी गोमांस खाऊं नये. हा व्यक्तिस्वातंत्र्याचा प्रश्न आहे आणि त्यांना गोमांस न खाण्याला पूर्ण मुभा आहे.

शकुंतलाबाई संततिनियमनाचे बाबतींत कितपत तज्ञ आहेत, अशी एक शंका वरील लेखकाने काढली आहे आणि या शंकेचें उत्तर आम्हालाच देणें भाग आहे. तेव्हा आम्ही असें सांगतों की आमच्या या विषयांतल्या अठरा वर्षांच्या अनुभवाचा फायदा आम्हीं शकुंतलाबाईंना दिलेला आहे व त्यांना जरूर ती माहिती आम्हींच दिलेली आहे. आमचे मतें तिचा उपयोग योग्य रीतीने करण्याइतकी बुद्धि त्यांना आहे, आणि बुद्धि असल्यास नवाशिक्यांनाही उपयोग करतां येईल अशी एक पद्धत आम्हीं त्यांना दाखवली आहे (हीच पद्धत आम्ही नवशिक्या डाक्तरांनाही सांगतों), आणि त्या पद्धतीने योग्य आकाराच्या टोपीची निवड शकुंतलाबाईंना करतां येते, अशी आमची खात्री झालेली आहे. तेव्हा या बाबतींत आम्ही पुर्णेकरांना त्यांची शिफारस करूं शकतों. आमच्या माहितीच्य कांही डाक्तरणींपेक्षाही त्या हें काम अधिक कसोशीने करतात असा आमचा अनुभव आहे, आणि असा अनुभव सांगतां येण्याइतक्या बायका इतक्या थोड्या वेळांत त्यांचेकडे येऊन गेलेल्या आहेत. तेव्हा या बाबतींत कोणाला शंका येण्यास बिलकुल जागा नाही.

त्यांच्याविरुद्ध गैरसमज पसरवण्याकरतां वरील लेखकाने विनाकारण त्यांच्या रशियन चित्रकाराशीं झालेल्या विवाहाला मधें ओढून आणलें आहे, आणि त्यावेळीं तो विवाह त्यांच्या मित्रांना पसंत पडला नव्हता, तशीच त्यांची हीही चळवळ त्यांना पसंत पडणार नाही असें म्हटलें आहे. शकुंतलाबाईंचे मित्र कर्मवीरमधील लेखकाइतके बावळट नाहींत अशी आमची खात्री आहे, आणि पुणेंकरही इतके मूर्ख नाहींत. शकुंतलाबाईंच्या जाहिरातीने नव्हे, तर कर्मवीर-मधील लेखानेच त्यांची बदनामी झाली आहे हें त्यांना सहज कळेल अशी आमची अपेक्षा आहे. आपलें हित कशांत आहे हें पुणेंकरांना कळतें. मुंबईच्या कर्मवीरने तें त्यांना शिकवण्याची जरूर नाही.

वैद्यकी व्यवसायांतील अनुभव

—:o:—

लेखक, डॉ. मराठे

वैद्यकीय व्यवसायांत कित्येक विलक्षण रोगी पहावयास मिळतात. अशा रोग्यांचे मासले आपल्या कांही वाचकांस तरी मार्गदर्शक होतील; किंवा एखाद्या मित्राला उपयोगी पडतील, म्हणून कांही रोग्यांच्या हृदयद्रावक कथा मधूनमधून देण्याचा विचार आहे.

१. विशीच्या आंत वयाचा, श्रीमंत बापाच्या ४–६ मुलांपैकी एक मुलगा, शाळेंत जाणारा. एके दिवशीं चारपांच मित्रमंडळींनी आपआपसांत कांही पैसे गोळा करून गंमत करायची ठरवली. सर्व मिळून एका धंदेवाल्या बाईकडे गेले, तेथे प्रत्येकाने मनसोक्त संभोगसुख घेतलें. सदर मुलाने एकंदर ५ वेळां संभोग केला. आपण काय चैन केली, असा आनंद ५–६ दिवसच टिकला असेल नसेल, तोंच एक दिवस लघ्वी करतांना आग होत आहे असें वाटलें, व थोड्याच वेळांत पू वाहूं लागला. लगेच तो आपल्या फॅमिली

डॉक्टरकडे गेला. डाक्टरने साधारण पाहिलें व पू कांचेवर घेऊन तपासण्यासाठी पाठवला. तपासणाऱ्या डॉक्टरने निकाल दिला की परमा आहे. लगेच फॅमिली डॉक्टरने पोटांत घेण्यासाठी औषध दिलें, दोन निरनिराळ्या तऱ्हेचीं इंजेक्शनें सुरू केलीं, मधूनमधून किंचित् लालसर पाण्याने मूत्रमार्ग धुण्यास सुरवात केली. याप्रमाणे जरी एक आठवडाभर इलाज चालू होते, तरी रोगी सुधारण्याचें चिन्ह दिसेना.

इतक्यांत अचानक रोग्याचे वडील गांवीं आले. फॅमिली डॉक्टर रोज कोणा ना कोणासाठी तरी घरीं व्हिजिट देतच असत. मुलगा मायनर (कायद्याने वयांत न आलेला) म्हणून डाक्टराने रोग्याची हकीकत वडिलांस नीट समजावून सांगितली. ही माहिती आपण विश्वासाने सांगत आहों, तरी योग्य ते इलाज करावे आणि मुलाचें नुकसान करूं नये, असें त्याने वडिलांस विनवलें. रोग्याचे वडील अतिशय विचारी व ममताळू गृहस्थ असल्यामुळे झाल्या गोष्टीबद्दल राग न धरतां, मुलगा बरा होण्यासाठीं काय करावें या विचारांत पडले. वडिलांचा व्यवसाय जरी निराळा होता, तरी त्यांनी या रोगाची जेवढी शास्त्रीय माहिती मिळेल तेवढी शक्य तितक्या लवकर (३–४ दिवसांतच) मिळवली आणि मित्र म्हणून फॅमिली डॉक्टरचाही सल्ला घेतला. थोडक्यांत त्यांचा असा बेत झाला की मुलाला योग्य इलाज करण्यासाठी मुंबईस न्यावें, कारण त्या गांवीं मोठ्या सरकारी हॉस्पिटलमधेंही योग्य इलाज करण्याची सोय नाहीं. शहरांतील सरकारी इस्पितळाला लागूनच एक वैद्यकी शिक्षणाचें विद्यापीठ आहे, तेथें या रोगांचा तज्ञ डाक्टर असूनही जरूर ती यंत्रसामग्री इस्पितळांत नाही असें फॅमिली डॉक्टरनेही कबूल केलें. या इस्पितळाची ही स्थिति, तर तेथें शिकून तयार होणाऱ्या डाक्टरांची या रोगांची चिकित्सा काय दर्जाची असेल, व प्रत्यक्ष गुरुजीच किती रोगी खात्रीशीर बरे करीत असतील ?

असो. फॅमिली डॉक्टरांस मुलाचे इलाज चालू ठेवण्यास सांगून वडील मुंबईस आले. सदर गृहस्थ माझे परम मित्र असल्यामुळे प्रथम मला येऊन भेटले व एकंदर कथा निवेदन केली. माझ्या येथे असा मुद्दा निघाला की मी

वडिलांच्या ओळखीचा, या एकाच कारणासाठी मुलगा कदाचित् (माझ्या येथे योग्य इलाज मिळतील अशी खात्री असून देखील) माझ्याकडे येणार नाही. मुलाने वडिलांना आपल्या विश्वासांत घेतलें नसल्यामुळे याबाबत वडील प्रत्यक्ष हात घालूं शकत नव्हते, पण मुलाच्या अप्रत्यक्ष वडील सर्व खटपट करावयास दोन्ही पायांवर तयार होते ! अर्थात् मुलाने स्वतः वडिलांस सांगितल्यास ते रोगी माझ्याकडे ठेवण्यास तयार होतेच. पण ज्याअर्थी मुलाने अजून वडिलांस कांहीच सांगितलें नव्हतें, त्याअर्थी मुंबईतच पण दुसऱ्या कोणा डॉक्टरकडे जाणें प्राप्त होतें. कोणाकडे जावें हा प्रश्न. मुंबईत तर अनेक खरेखोटे, स्वस्तमहाग, स्पेशॅलिस्ट् म्हणवणारे लोक आहेत. माझ्या सल्ल्याने दोनतीन डॉक्टरांस ते भेटले. पैकी एका डॉक्टरकडे जाण्याचें ठरवून त्यांचा पत्ता वगैरे घेऊन ते गृहस्थ आपल्या गांवीं गेले. फॅमिली डॉक्टरने हा पत्ता देऊन मुलाला परस्पर त्या डॉक्टरकडे पाठवावें ही इच्छा. म्हणजे मुलास योग्य इलाज मिळतील, व वडिलांचे नकळत आपण बरे होत आहोंत हा मुलाचा विश्वास राहील.

आपण खटपटी करतों, पण सर्वच आपल्या मनाप्रमाणे थोडेंच होत असतें ? वडील तिकडे जाऊन पोंचतात तों मुलगा मुंबईत हजर ! आपल्या गांवीं अ.पण बरे न होतां रोग जास्तच बळावत आहे असें मुलाने पाहून मुंबईची वाट धरली. येथे आल्यावर एका होमिओपाथ डॉक्टरकडे हा मुलगा गेला. कारण त्या डॉक्टरने यांच्या कुटुंबांतील दोनचार मंडळींस फलाण्या रोगांपासून मुक्त केलें होतें. त्याच्या अजाण बुद्धीस या रोगावरही होमिओपाथ उपयोगी पडेल असें वाटलें. (होमिओपाथीबद्दल आमचें स्वतःचें मत अधिक चांगलें आहे. **संपादक.**)

मुंबईत येण्यापूर्वीच त्या मुलाला थोडा ताप येऊं लागला होता. शिस्नास सूज येऊं लागली होती, व पू कमी न होतां वाढतच होता. डॉक्टरचे इलाज चालूच होते, जवळजवळ तीन आठवडे इलाज करून चौथ्या आठवड्याला होमिपाथचे इलाज चालू झाले, तीनचार दिवसांत वडील परत आले व एकंदर स्थिति कशी काय आहे हें अजमावीत होते. रोज मुलाला विचारीत होते, 'कायरे, काय होतें आहे ?' 'ताप येत आहे, आपल्या × × × डॉक्ट-

रचें (होमिओपाथ) औषध घेत आहें, वगैरे.' दहा दिवस औषध घेऊनही ताप कमी न होतां वाढतच होता. तेव्हा वडिलांनी मुलाला ममतेनें जवळ घेऊन विचारलें, ' हें पहा, कांहीं लपवून न ठेवतां काय काय होत आहे तें सर्व सांग पाहूं. आपल्याला लवकर बरें झालें पाहिजे ना ? घाबरूं नको.' मुलाने कोणत्याही प्रकारें आढेवेढे न घेतां प्रथमपासून सर्व हकीकत सांगितली. माझ्या कल्पनेप्रमाणे मीं बरा होण्यासाठी खटपट केली, पण आतां आपल्या सल्ल्याप्रमाणे करण्यास माझी कांही हरकत नाही.' झालें. सर्व भ्रमाचा भोपळा फुटला व त्याच दिवशीं बापलेक माझ्याकडे आले,

प्रथम रोगलक्षण दिसूं लागल्यापासून एक महिन्याने स्वारी माझ्याकडे आली. त्या दिवशीं मी तपासूं लागतांच त्याला आश्चर्याचा धक्काच बसला. 'डॉक्टर, इतका भयंकर रोग मला झाला आहे, आणि तुम्ही सर्व हातांनी तपसतां, हें कसें काय ? तुम्हाला रोग होईल अशी भीति नाही वाटत ?'

' माझ्याबद्दल काळजी नको. पूर्णपणें तपासणें हें माझें काम आहे. माझी जबाबदारी मी ओळखून आहें.' त्या तपासणींत मला काय काय दिसलें ? पू सारखा वहात होता, शिस्न उघडत नव्हतें, सूज. लांबी ८ इंच, जाडी २ इंच (परिघ ६ इंचांपेक्षा जास्त), जांघेंतल्या गांठी सुजलेल्या, ताप १०१°, रोज थंडी वाजून ताप १०३॥° पर्यंत चढतो अशी माहिती. शिस्नाच्या पुढील मोकळी जागा सुजून त्यांत दोन जाड घट्ट गांठी हातास लागत होत्या. वजन ६ पौंड कमी झालें होतें. त्याचे वडील शेजारींच उभे होते. त्यांनी विचारलें ' डाक्टर, काय दिसतें आहे ? '

' एकंदर प्रकरण बरेंच वाढलेलें दिसत आहे. आपल्या फॅमिली डॉक्टरने परम्याशिवाय आणखी कांही सांगितलें नाही काय ?' ' नाही ' ' रोग्यास एकंदर तीन मेडल्स मिळालीं आहेत. गोल्ड मेडल–गॉनोरिया. तो आहे हें आपणास माहीतच आहे. कॉपर मेडल–शँक्रॉइड् (चांदी, बद). त्यामुळे ही सूज व ताप आहेत. गांठी सुजल्या आहेत, दुखत आहेत, त्या या रोगामुळेच. सिल्व्हर मेडल-

सिफिलिस् पण आहे हें आपणास कोणी सांगितलें नसेल, पण कोणीं नीट सून पाहिलेलेंच दिसत नाही. कशावरून ? तर आपण याचें रक्त तपासलो त्यांत 'वासरमन् टेस्ट्' अस्तिपक्षीं येईल.'

एकंदर कायकाय इलाज कसेकसे करणें जरूर आहे तें सांगून सु दुसरे दिवशीं ज्या सुईने शिरेंतून रक्त घेतलें, त्याच सुईतून निओसाल्व्हस इंजेक्शन दिलें. रिपोर्टसाठी थांबण्याची जरूर नाही असें त्यांस पटवलें. दोन सांनी रक्ताचा रिपोर्ट अस्तिपक्षीं आलेला दाखवून आपल्या फॅमिली डॉक्ट पाठवून द्या असें सांगितलें.

चांदी व बद झालें होतें, त्यासाठी जरूर तीं इंजेक्शनें व इतर इलाज रोज थोडीथोडी सूज उतरून पंधरा दिवसांत शिस्न मूळच्या आकारावर ताप गेला, तरीपण शिस्नाग्र उघडत नव्हतें, त्याकरितां सुंता करावी लागली. वरच योग्य तपासणी झाली असती व जरूर ते इलाज मिळते, तर सुंता लागली नसती. सुंता करून नुकसान कांहीच नाही म्हणा. तें एक बरेंच झा

नंतर परम्याकरतां उपाय जारीने करतां आले व रोगी सुधारत गेला एकंदरींत जरी मी त्या रोग्याला सुधारण्यास उपयोगी पडलो, तरी तो मात्र त येतील ते अपशब्द आपल्या फॅमिली डॉक्टरला व होमिओपाथला देत अ त्याला कारण मीच नव्हे ना ?

पत्रव्यवहार

१.

आपण समाजस्वास्थ्याच्या डिसेंबरच्या अंकांत प्रसाददीक्षेचें परीक्षण आहे. त्यांत आपण गांधींचा भविष्यावर विश्वास आहे असें म्हणतां पुराव्याकरतां '४ थ्या जुलैची जरूर वाट पहा. वर्ष वाटेल तें असो, आणि तारखेचा निश्चय झाला हें काय थोडें आहे ?' हें वाक्य उद्धृत आपण जर त्यापुढची तीन वाक्यें लक्षपूर्वक वाचलीं असतींत तर त्यांत तु

भविष्याचा उपहासच आढळून आला असता. आपणाकडे पुस्तक असेलच, पुनः एकदां तो मजकूर वाचून पहा आणि आपली चूक वाटल्यास लागलीच कबूल करा. आपला **नी. ज. म्हात्रे**, दादर, मुंबई.

उ. तें पुस्तक सध्यां हातांत नाही, परंतु हा मजकूर उपहासानेच लिहिला आहे असें नक्की म्हणतां येण्यासारखें त्यांत कांही आहे असें वाटत नाहीं. गांधींचा ज्योतिषावर विश्वास नाही असें ज्यांना वाटत असेल, त्यांना तसा अर्थ कदाचित् त्यांतून काढतां येईल (म्हणजे तसें म्हणतां येईल, इतकेंच). परंतु गांधींच्या इतर वेडगळ समजुती लक्षांत घेतां ज्योतिषावर त्यांचा विश्वास नसेल असें अनुमान काढतां येणार नाही. अर्थात् त्यांनी स्वतः तसें सांगितल्यास तसें मानण्यास आमची हरकत नाही, परंतु तेथपर्यंत चूक कबूल करण्याचें कांही कारण नाही. आणि त्यांनी सांगितलें तरी जेथे संशयाला जागा आहे तेथे आम्हास योग्य वाटला तो अर्थ आम्ही घेतला, ही आमची चूक नव्हे. **सं.**

२.

१. आपण लंगोटाविषयी जें सकारण उत्तर दिलें तसेंच पैलवानाच्या कामशक्तीविषयीं द्यायला पाहिजे होतें. तुम्ही सांगता म्हणून खरें मानायचें काय ? तुमचीं सर्व उत्तरें खरींच असतात कशावरून ? पैलवानाची कामशक्ति कमी असते हें ज्या अनुभवी तज्ञाने सांगितलें, त्याने ती कशी कमी होते, काय कारणाने कमी होते, त्याला हें कारण (अनुभव) सांगतां आला असता. कां अनुभव तो अनुभवच म्हणून खरें मानायचें ? लंगोटामुळे हवा मिळत नाही म्हणून, हें जसें सकारण उत्तर, तसेंच व्यायामाने कामशक्ति कशी कमी होते हें सांगायला पाहिजे. व्यायामाने स्नायुबलाची वृद्धि होऊन अंगांत शक्ति (सामर्थ्य) येतें. तरमग कामशक्तिच कां कमी व्हावी ? तशी जर कामशक्ति कमी झाली असती, तर जगांत पैलवानही झाले नसते व कोणीं व्यायामही केला नसता. २. लंगोटामुळे वीर्यरक्षण होत नाही हें आम्ही कबूल करूं, कारण तो आमचा अनुभव आहे. पण वीर्य शरीरांत राहिल्याने कांहीं फायदा होतो हें खोटें असून हा पारंपारिक वेडगळपण

आहे हें कसें ? वीर्य शरीरांतून गेल्यावर किती तोटे होतात, शक्तीचा किती ऱ्हास होतो, हें कोणताही समंजस मनुष्य कबूल करील, आपला **डोंगरे.**

उ. १. अनुभव आणि कारण, यांत आपण निष्कारण घोटाळा करीत आहांत. कारण सांगतां न आलें तरी अनुभवाला बाध येत नाही. चंद्राला ग्रहण लागण्याचें कारण पूर्वी असें समजत असत की राहू चंद्राला खातो. परंतु आतां असें समजतें की चंद्रावर पृथ्वीची सावली पडल्यामुळे त्याला ग्रहण लागतें. पूर्वी खरें कारण माहीत नव्हतें, तरीपण चंद्रग्रहणाचा अनुभव होताच. त्यांत फरक झाला नाही. तेव्हा कारण न सांगतां आलें तरी अनुभव चुकीचा ठरत नाही. आमच्या उत्तरांवर आपण विश्वास ठेवलाच पाहिजे असा आमचा मुळीच आग्रह नाही. अनुभव ज्याने सांगितला त्याला कारण सांगतां आलेंच पाहिजे असें नाही. सांगतां आलें तर तो सांगेल. पहिलवानांचे बाबतींत कारण सांगतां येणारच नाही असें नाही आपण यांतही थोडासा घोटाळा करीत आहांत. व्यायामाने स्नायुबल वाढून अंगांत शक्ति येते, आणि कामशक्ति ही एक प्रकारची शक्ति आहे, तेव्हा तीही व्यायामाने यावी असें आपलें म्हणणें. परंतु कामशक्ति ही स्नायूंची शक्ति नव्हे. स्नायूंची शक्ति आणि एकंदर चांगली प्रकृति या वेगळ्या गोष्टी आहेत. यामुळे पुष्कळ वेळां रोगाच्या सांथीतून एखादा सामान्य मनुष्य बचावतो आणि एखादा पहिलवान दगावतो. कामशक्ति ही एकंदर प्रकृतीवर अवलंबते, स्नायुबलाबर नव्हे. कामशक्ति कमी होणें हा प्रकृतींत एक प्रकारचा बिघाड आहे, तेव्हा तो योग्य व्यायामाने होऊं नये हें खरें. मात्र योग्य व्यायाम म्हणजे काय, एवढाच प्रश्न आहे. पहिलवानी थाटाचा व्यायाम हा योग्य व्यायाम नव्हे, इतकेंच आमचें म्हणणें आहे. स्नायुबलाच्या मागे लागल्याने एकंदर प्रकृतीची हानि होते यांत तिळमात्र शंका नाही, मग आपण खरें माना अगर न माना. यासंबंधी वैद्यकीय मत पुढील अंकीं देऊं. **२.** समागमाच्या अतिरेकाने जे तोटे होतात, ते वीर्य शरीराबाहेर गेल्याने होत नसून मज्जातंतूंवर ताण पडल्या-

मुळे होतात असें आधुनिक मत आहे. अशा अतिरेकाने येणारा थकवा, आणि फार अभ्यास केल्याने येणारा थकवा, हे दोन्ही एकाच प्रकारचे असतात, आणि दुसऱ्या प्रकारांत तर वीर्याचा कांही संबंध नसतो ? हें तज्ज्ञांचें मत आम्ही सांगतों. तें आपण न मानल्यानेही खोटें होत नाही. **सं.**

३

आपल्या मासिकाविषयी दोन शब्द लिहावेसें वाटतें. आपण आपलें बहुतेक आयुष्य ज्या शास्त्राच्या अभ्यासांत व व्यासंगांत घालवलें, त्याच शास्त्राचा शक्य तितका पुरस्कार करण्याच्या मुख्य हेतूने आपण आपलें मासिक सुरू केलें आहे. सदर मासिकाच्या गेल्या कांही अंकांतून या शास्त्राशीं संबंध नसलेल्या विषयांस स्थान दिलें जात आहे, उदाहरणार्थ ईश्वरवाद व ग्रंथपरीक्षण. आपण ज्या विषयाचा परिश्रमपूर्वक अभ्यास केला आहे, त्यासंबंधी आपले स्वतांचे तसेंच पाश्चात्य प्रसिद्ध तज्ज्ञांचे विचार समजण्याविषयी वाचकांची जिज्ञासा असते. समाजस्वास्थ्य हा विषय कितीही व्यापक आहे असें मानलें, तरी त्यांत ग्रंथपरीक्षणाचा अंतर्भाव होऊं शकेल असें वाटत नाही. ग्रंथपरीक्षण हें कार्य वाङ्मयविषयक नियतकालिकांचें आहे. समाजस्वास्थ्यांत त्यांचा अंतर्भाव होऊं शकेल असें म्हटल्यास आधुनिक कवींच्या कविता, अगर इतर लेखकांचे विविध विषयांवर लेख, यांसही स्थान द्यावें लागेल व मग आपल्या मासिकाचें वैशिष्ट्य नाहींसें होईल. ईश्वरवादासारख्या तत्वज्ञानविषयक लेखमालिका आपण कां सुरू कराव्यात ? असल्या विषयांची ज्या वाचकांस जिज्ञासा असेल त्यांचेकरतां पं. सातवळेकर प्रभृति साहित्यिक संपादन करीतच आहेत. तीच गोष्ट ग्रंथपरीक्षणाची. हल्ली निर्माण होत असलेल्या अनेक लघुकथासंग्रहांवर अभिप्राय देण्याचें कार्य इतर वाङ्मयसेवक आपापल्या मासिकद्वारा करीत आहेत. आपल्या मासिकाचें मूळ ध्येय सोडून या नवीन क्षेत्रांत पाऊल टाकण्याची जरूरी नव्हती. गेल्या दिसेंबर १५ ला प्रसिद्ध झालेल्या अंकांत आपण चार ग्रंथांचें परीक्षण केलें आहे व या कामीं आपल्या छोटेखानी मासिकाचीं १२ पृष्ठें खर्ची पडलीं आहेत. शिवाय ईश्वरवाद व गूढविद्या यांनी १० पृष्ठें घेतलीं तीं वेगळींच.

आपल्या आवडत्या विषयास जेमतेम ७–८ पृष्ठें मिळालीं आहेत. आपण अभ्यासलेल्या विषयासंबंधी नवीन ज्ञान मिळवण्याकरतां उत्सुक असलेल्या वाचकांची सदरहू अंक पाहून बहुतेक निराशाच होईल. माझ्या मतें आपल्या कार्यक्षेत्रांत वरील विषयांचा समावेश होत नाही. तरी याबद्दल आपलें काय म्हणणें आहे तें मासिकद्वारा प्रसिद्ध करावें. तेणेंकरून इतर वाचकांचें मत अजमावतां येईल.
आपला, **आत्माराम दामोदर सोनार**, जुनें धुळें.

उ. या मासिकाच्यां सुरवातीच्या अंकांतील पहिल्या वाक्यांत मासिकाचा उद्देश सांगितला आहे तो असाः—'व्यक्तीच्या व समाजाच्या शारीरिक व मानसिक आरोग्याची व त्यासंबंधी उपायांची चर्चा करणें हा या मासिकाचा उद्देश आहे.' आमचे मतें धार्मिक किंवा इतर वेडगळ समजुती मानसिक आरोग्याला घातक आहेत आणि अशा समजुतींविरुद्ध लिहून मतप्रचार करणें हें या मासिकाचें एक कर्तव्य आहे. ईश्वराचें अस्तित्व हा केवळ तात्विक प्रश्न नाही, तो व्यावहारिक दृष्टीने मोठा महत्वाचा प्रश्न आहे. ईश्वराचा हवाला देऊन धाडधाकट धार्मिक भिकारी समाजाला लुटीत आहेत. इतकेंच नव्हे तर म. गांधींसारखे लोक स्वतःचींच अधींकचीं मतें ईश्वराच्या नांवावर दडपून देत आहेत, बावळट लोक त्यांच्यामागून जात आहेत, आणि कार्यसाधु लोक त्यांचा फायदा घेत आहेत. अशा स्थितींत ईश्वराच्या अस्तित्वाला कोणताही पुरावा नाही इतकेंच नव्हे तर तें मानल्यापासून कोणत्याही प्रकारचा फायदा नाही आणि उलट नुकसानच आहे असें दाखवणें, हें समाजाच्या हिताच्या दृष्टीने आमचें कर्तव्य ठरतें. एकंदरींत प्रत्येक विषयाचे बाबातीत बुद्धिप्रामाण्याची कसोटी लावणें हें आम्ही आमचें काम समजतों, आणि वरील गोष्टी लोकांना आंधळे करून बुद्धिप्रामाण्याच्या आड येतात म्हणून आम्हाला त्यांविरुद्ध लिहावें लागतें. कामशास्त्राला आम्ही विशेष महत्व देतों तें केवळ तो आमचा आवडता विषय म्हणून नव्हे, तर त्या विषयांत पूर्वग्रह सोडून बुद्धिप्रामाण्याची कसोटी लावणें हें सामान्य लोकांनाच काय, पण पुढारलेले म्हणवणारांना देखील अत्यंत जड जातें व म्हणूनच आम्हाला त्यावर भर द्यावा लागतो. या दृष्टीने पाहतां

दिसेंबरच्या अंकांतील ग्रंथपरीक्षणें देखील आमच्या विषयांत येणारींच आहेत. पहिलीं दोन लांबलचक आहेत, तीं त्या पुस्तकांतल्या वेडगळ कल्पनांमुळेच. दुसरीं दोन मात्र कदाचित् केवळ ललितवाङ्मयांत घालतां येतील. पण त्यांना फक्त चार पानें दिलीं आहेत. त्यांत देखील असा विचार केला पाहिजे की ललितवाङ्मय हें मतप्रचाराकरतांच आहे असें म्हणणारा आज एक पक्ष आहे. तेव्हां पुस्तकपरीक्षण देखील आमच्या विषयाबाहेर नाहीं, खरें पाहिलें तर कोणत्याही विषयावर आम्हाला आमची विचारसरणी मांडतां येतेच, आणि नेहमीं एकचएक विषय लिहिण्यापेक्षां असें केल्यानें त्यांत विविधता अधिक येते. इतर नियतकालिकें आमचें काम बिलकूल करीत नाहीत. ईश्वरवादाविषयीं आपण आमची तुलना पं. सातवळेकरांशीं करतां हें खरोखरच आश्चर्य आहे! आम्ही लिहिलेला एक शब्द देखील त्यांना लिहितां येणार नाहीं, व त्यांनी लिहिलेला आमच्या लेखणींतून उतरणार नाही. ग्रंथपरीक्षणांत देखील आमचें वैशिष्ट्य असतें अशी आमची समजूत आहे. आपणास काय वाटेल तें वेगळें.

४

जानेवारीच्या अंकांत पृ. २४८ वर अरुण यांचें पत्र व त्याखाली आपलें उत्तर प्रसिद्ध झालें आहे. दोन मावसभावांच्या मुलामुलीचा विवाह हिंदुधर्मशास्त्राप्रमाणे होईल काय, असा अरुण यांचा प्रश्न आहे. हा विवाह सपिंडांतील असल्याने धर्मशास्त्रास मान्य नाही असें शास्त्री सांगणारच. शंकराचार्यांकडे गेल्यासही तसाच निर्णय मिळेल. मामेबहिण व आतेबहिण यांच्याशीं लग्नें ब्राह्मणांतही होतात. तेथें सापिंड्याची अडचण मानली जात नाही. मामा व भाची यांचेही विवाह ब्राह्मणांतही होतात. तेव्हाही सापिंडाची अडचण नजरेआड केली जाते. एका ब्राह्मण वराचा त्याच्या मावसबहिणीबरोबर झालेला विवाह प्रसिद्ध आहे, तेथें मुलगी दत्तक देऊन सापिंड्यांतून पळवाट काढली असें ऐकतों. अरुण यांच्या पुतण्याची इच्छा बापाच्या मावसभावाच्या मुलीबरोबर लग्न करण्याची आहे. अशा लग्नास कांहीं हरकत आहे असें मला वाटत नाहीं. या कामीं अभिप्राय घेत बसणें धोक्याचें असतें. स्पष्ट संमति कोणीही शास्त्री देऊं शकणार नाही, पण

विवाहविधि होऊन गेल्यावर 'सिद्धस्य गतिश्चिंतनीया' या न्यायाने रूढीचे व मागील पुराणांतील दाखले दाखवून असल्या विवाहाचें समर्थन करण्यास तेच शास्त्री पुढे येतील. येथे 'मिया बिबी राजी, तो क्या करेगा काजी,' हें तत्व अंमलांत आणलें पाहिजे. दोन जीवांना असंतुष्ट ठेवणें केव्हाही वाईटच. त्यांचें लग्न लागल्यावर धर्मशास्त्राची अडचण आपोआप मागे पडेल. **भास्करराव जाधव, १६. १. ३९.**

उ. आपला उपदेश ठीक आहे व तितकें धैर्य असेल त्यांनी जरूर तसेंच करावें. पण त्यांतही एक अडचण आहे की लग्न लावायला भट लागतो, आणि तो कदाचित् कबूल करणार नाही. अर्थात् थोडी दक्षिणा जास्त दिली तर भटही मिळेल. **सं.**

इतर पत्रांतील कांही प्रश्न

१. संततिनियमनाकरतां आपण डच् कॅप व जेली हाच खात्रीचा उपाय म्हणून सांगतां. परंतु तो उपयोगांत आणणें फारच कठीण व त्रासाचें काम आहे. याशिवाय दुसरा आधुनिक सोपा उपाय नाही काय? २. आपण आपल्या मासिकांत डाक्तर, इग्लंद, आयर्लंद, वगैरे शब्द का बापरतां? त्यांचे इंग्लिश उच्चार असेच आहेत काय? ३. गृहकर्मे हें सदर मासिकांत घेण्याचें आपलें धोरण काय आहे? ४. स्वास्थ्यावर एकदां एक अश्लील मजकूर लिहिल्याबद्दल खटला भरला होता. तसाच गांधींच्या एका शिष्यानें प्रसिद्ध केलेल्या 'प्रसाददीक्षा' पुस्तकावर भरतां येत नाही काय! ५. राठ केंस मऊ व कुरळे बनवतां येण्याचा उपाय असल्यास सांगावा ६. एका पशुवैद्याने पशुपक्ष्यांवर प्रयोगांनीं असें सिद्ध केलें आहे की स्त्रीअंडाची संपूर्ण वाढ होऊन गर्भधारणा झाल्यास पुत्र होतो, व अपूर्ण झाल्यास मुलगी होते. आपलें यावर काय मत आहे? मुलगा व मुलगी होण्याचीं कारणें काय आहेत?

उ. १. यापेक्षा सोपा उपाय निघाला म्हणजे आम्ही सांगूंच, पण याकरतां थोडा त्रास पडला तरी त्याने पुढील त्रास किती वांचतो हें आपल्या कसें लक्षांत येत नाही? २. 'डाक्तर' हा शब्द मराठी रूप म्हणून श्रीपाद

कृष्ण कोल्हटकरांनी वापरला आहे. इंग्रजींतील 'डी' या अक्षराचा हुबेहुब उच्चार मराठींत नाही. त्याचा उच्चार 'द' व 'ड' यांचे मधे आहे, परंतु 'द' च्या अधिक जवळ आहे. म्हणून तो वापरतों. ३. तें सदर पुष्कळांना उपयुक्त वाटतें. ४. अश्लीलतेबद्दल खटला सरकारने करावा लागतो, आणि सध्यां गांधीच सरकार असल्यामुळे त्या पुस्तकाविरुद्ध खटला होणें अशक्य आहे. आमचे मतें कांहींच अश्लील नसतें, यामुळे तें पुस्तकही अश्लील नाही. ५. केंसावर लाटा दिसतील अशा प्रकारचे कांही प्रयोग हल्ली निघाले आहेत. मुंबईतील कांही केशरचनागृहें आपणास मदत करूं शकतील. ६. या बाबतींत मनुष्यांत व पशूंत फरक असूं शकेल. यासंबंधी माहिती पूर्वी आलेली आहे. **सं.**

शारदेचें पत्र

——xx——

एकाच पुस्तकाचीं परीक्षणें वेगवेगळ्या लोकांनी लिहिलेलीं वाचलीं म्हणजे मोठी करमणूक होते. मोहनी नांवाच्या एका गृहस्थांनी ' आमचा सनातनधर्म ' नांवाचें पुस्तक लिहिलें आहे असें दिसतें. मीं कांही पुस्तक पाहिलें नाही. पण त्यावर दोन टीका वाचल्या. एक टीका नागपुरच्या **महाराष्ट्रांत** विद्याभूषण श्री. कृष्णशास्त्री घुले यांनी लिहिलेली आहे आणि दुसरी **लोकशिक्षण** मासिकांत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी लिहिली आहे. पहिले शास्त्रीबोवा म्हणतात कीं " पाश्चात्यांच्या विचारसरणीला अनुसरून आपल्या समाजाची सुधारणा कशी करतां येईल हें ठरवणें, म्हणजे पाश्चात्यांच्या धर्तीवर आपल्या समाजाची सुधारणा करणें, हा प्रस्तुत पुस्तक लिहिण्यांत लेखकाचा उद्देश आहे हें स्पष्ट आहे...आणि अशा पुस्तकाला ' आमचा सनातन धर्म ' असें नांव देणें म्हणजे रामाची कथा, कृष्णाची कथा, गणपतीची कथा इ, नांवें देऊन ख्रिस्ती धर्माचा उपदेश करणारीं पुस्तकें विकणाऱ्या ख्रिस्ती धर्मोपदेशकांप्रमाणे निष्कपट लोकांची फसवणूक करणें नव्हे काय ? " हे शास्त्रीबोवा आधुनिक सुशिक्षित लोकांतल्या सुधारकांचे दोन वर्ग करतात. एक वर्ग कशाचीही पर्वा न करतां बेधडक पाश्चा-

त्यांचें अनुकरण करणारा, आणि दुसरा वर्ग भ्याड सुधारकांचा. यांनाही साहेबच बनायचें असतें, पण ते आपल्या अशिक्षित धर्मबांधवांना थोडेसे भीत असल्यामुळें ते 'धर्मशास्त्रांतील शब्दांचा व वचनांचा स्वमतानुकूल भलतासलता व संदर्भनिरपेक्ष अर्थ करून, आपण धर्मशास्त्राप्रमाणेच वागतों असें शास्त्रानभिज्ञ लोकांना बळेंच भासवण्याचा व अधर्माला धर्म या नांवाने खपवण्याचा अप्रामाणिक व अश्लाघ्य प्रयत्न करतात.' आतां या पुस्तकाचे लेखक त्यांच्या ओळखीचे असल्यामुळे त्यांना त्यांनी सरळ या भ्याड वर्गांत बसवलें नाही, पण पर्यायाने बसवलें आहेच. ते म्हणतात की या पुस्तकाचे लेखक स्वतः अत्यंत प्रामाणिक आहेत, पण त्यांच्यावर वरील भ्याड लोकांच्या लिखाणाचा परिणाम झालेला आहे, यामुळे त्यांनी असें पुस्तक लिहिलें. थोडक्यांत सांगायचें म्हणजे या लेखकाला स्वतःला प्रामाणिकपणा असला तरी स्वतःची अक्कल आणि तारतम्य ज्ञान नसल्यामुळे त्यांनी भ्याड वर्गाचें अनुकरण केलेलें आहे! लेखकाची स्वतःची भूमिका दाखवण्याकरतां त्यांनी पुस्तकांतलें शेवटचें वाक्य उतरलें आहे तें असें, 'एकंदरींत समाजकल्याणाकरतां स्वप्रवृत्त्यनुसार कार्य वांटून घेणारांची संघटना निर्माण करून ती टिकवण्याची शिकस्त करणें हाच सनातन धर्म आहे हें जगांतील सर्व लोकांस पटण्यासारखें आहे.' पण तें या शास्त्रीबोवांना मात्र पटत नाहीं. त्यांचें म्हणणें की सनातन धर्म म्हणजे वैदिक धर्म. त्यांत समाजकल्याणाचा काय संबंध? आणि हें अगदी अक्षरशः खरें आहे. धर्म म्हणजे स्वतःसाठी पुण्यसंपादन करण्याचा आणि मोक्ष मिळवण्याचा मार्ग आहे. दुसऱ्याचें काय होईल याचा संबंध त्यांत येतोच कशाला! दान तरी करायचें कशाकरतां? दुसऱ्याचें बरें व्हावें म्हणून नव्हे, तर स्वतःला पुण्य लागावें म्हणून. याला कोणी पाहिजे तर स्वार्थ म्हणो, पण मोक्षासारखें बक्षिस मिळायचें असल्यावर लोकांच्या म्हणण्याकडे लक्ष द्यायचें प्रयोजन काय? नासिकाग्रावर दृष्टि ठेवून मोक्षाच्या मार्गे लागलें म्हणजे दुसऱ्याचें दुःख दिसेलच कशाला? आणि कदाचित् चुकून दिसलेंच, तर 'माया' आहे म्हणून सोडून द्यावें झालें. एरवी मोक्ष कसा लाभणार? शास्त्रीबोवा तर या पुस्तकाला नास्तिकवादच म्हणतात, कारण त्यांत सांगितलें आहे की

'सनातन धर्मांतील प्रमुख विचारसरणी खोल दृष्टीने पाहिल्यास असें दिसून येतें की इतर धर्मांत अवश्य मानलेल्या ईश्वरविषयक विचारांच्या अधिष्ठानाची हिंदुधर्माच्या भव्य इमारतीला मूलभूत अशी गरज आहे असें समजण्यांत आलेलें नाही.' हा विचार शास्त्रीबोवांना कितीही भयंकर वाटला, तरी वेदांत्यांनी ईश्वराच्या कल्पनेला गुंडाळूनच ठेवलें आहे यांत कांही शंका नाही. तरीपण घुलेशास्त्र्यांना तें भयंकर वाटतें खरें.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्रीही या पुस्तकाला नांवेंच ठेवतात, पण ते बराबर उलट बाजूने. त्यांचा लेख इतका आधुनिक मताचा आहे की **लोकशिक्षणा**-सारख्या सोवळ्या मासिकाने तो लेख छापला कसा याचेंच आश्चर्य वाटतें. ते म्हणतात, "या देशांतील पांढरपेशा शिक्षित मध्यमवर्गाने ('सुशिक्षित' म्हणण्याची शास्त्रीबोवांची तयारी नाही असें दिसतें) पुरातन भारतीय संस्कृतींतील तत्त्वांना नवा उजळा देऊन राष्ट्रीय वृत्तीच्या पिढीचें एक तत्वज्ञान निर्माण केलें. अशा तत्ववेत्त्यांत स्वामी दयानंद, विवेकानन्द, टिळक, अरविन्द घोष, प्रभृतींची प्रामुख्याने गणना होते...प्राचीन भारतीय आर्यांच्या परंपरागत विचारपद्धतीला शाश्वत, अबाधित व एकमेवाद्वितीय कल्पून तिच्यावर भाष्यें, रहस्यें, व्याख्यानें, निरूपणें व समर्थनें लिहून भारतीयांच्या भविष्यकालीन उत्थानाची व उद्धाराची सर्व शक्ति त्यांतच आहे असें वरील सर्व मंडळींनी अट्टाहासाने प्रतिपादिलें आहे....भारताची अवनति ह्या पुरातन शक्तींच्या ठेव्यांची विस्मृति झाली म्हणूनच झाली...पाश्चात्य लोकांच्या आधिभौतिक समाजाला, संकुचित धर्माला व अनुदार प्रवृत्तींना आमच्या धर्मविचारांची व तत्त्वज्ञानाची जोड दिली तरच तरणोपाय आहे; असें याचें आव्हानपूर्वक सांगणें आहे. तथापि मुल्ला व पाद्री यांनाहि आपल्या संस्कृतीविषयी व धर्माविषयी असेंच वाटतें...अर्थात् पूर्वोक्त भारतीय तत्वविचारकांच्या परंपरेचेच प्रस्तुत पुस्तकाचे लेखक होत. 'आमचा सनातनधर्म' या नांवावरूनच लेखकांचा आविर्भाव लक्षांत येतो."

त्या बिचाऱ्या अर्धसनातनी लेखकाला मात्र मधल्यामधें मृदंगासारख्या दोन्हीकडून थपडा खाव्या लागल्या आहेत. बाकी त्या योग्य नाहीत असें कोण

म्हणेल ? यांना शास्त्रार्थ काढायला सांगितला होता कोणी ? स्वतःचीं मतें सरळ 'मला असें वाटतें' म्हणून मांडावीं म्हणजे असें होत नाहीं. पण कांही लोकांना ती संवयच असते. विधवाविवाहाचा प्रचार करायचा आहे ? तरमग मनुस्मृति काय म्हणते, पराशरस्मृति काय म्हणते, या चौकशा करायच्या आहेत काय ? सरळ सांगावें की झाडून सगळ्या श्रुतींनी आणि स्मृतींनी जरी विधवाविवाहाचा निषेध केला असला, तरी आमच्या मतें तो इष्ट आहे. एवींतेवीं स्मृतींचे आधार काढून देखील बुरसट सनातनी ऐकतात थोडेच ? त्यांना कोणीकडून तरी चालू रूढि बरोबर आहे एवढेंच प्रतिपादायचें असतें. त्यांना कांही शास्त्राधार सांपडला नाहीं, तरी देखील ' शास्त्राद्रूढिर्बलीयसी ' हें गहन तत्व आहेच की नाही त्यांच्या बाजूचें ? अशा लोकांशीं वाद घालाच कशाला ? शिवाय हिंदुधर्म म्हणजे काय हें आजपर्यंत कोणाला समजलें असतें तर 'धर्मस्य तत्वं निहितं गुहायां' असें लिहिण्याचा प्रसंग कां आला असता ? पण नाही, अर्धवट लोकांना शास्त्राधाराशिवाय बरेंच वाटत नाही, मग तो कितीहि ओढाताण करून काढलेला असो. पुष्कळशी ओढाताण केली म्हणजे एकमेकांच्या बरोबर उलट असे अर्थही निघतात, आणि धर्म म्हणजे सगळ्या जगभर भांडणाचें मूळ झालेला आहे तो यामुळेच. बायबलाचा वेगवेगळा अर्थ करून ख्रिस्ती धर्माचे शेंकडों पंथ झाले, आणि हिंदु धर्मांतही कांही पंथ कमी नाहीत, आणि जो तो म्हणतो की आपला पंथ खरा आणि बाकीचे खोटे ! त्यापेक्षा धर्माला अजीबातच चाट दिलेली बरी नाही ?

तर्कतीर्थ जोश्यांनीं तर लेखकाची खूपच संभावना केली आहे. ते म्हणतात ' जुन्या जगापाशी नव्या जगाला मार्गदर्शक असा अलौकिक संदेश असतो ही एक भारतीय शिक्षितांच्या ठायीं असलेली मोठी आत्मवंचक, आत्मघातकी भ्रांति आहे. ही भ्रांति दृढमूल करण्याचें कार्य दुर्दैवाने विवेकानंद, टिळक, अरविंद व गांधी यांच्यासारख्या महान् सुशिक्षित पुढाऱ्यांनी वेद, उपनिषदें, गीता, इत्यादि प्राचीन ग्रंथांच्या विवरणानें केलें आहे.' या विधानांत एकच चूक आहे. ती म्हणजे गांधींना महान् सुशिक्षित समजणें. गांधींचें

शिक्षण अत्यंत तुटकें आणि अपुरें आहे. शास्त्रीबोवांनी उल्लेखिलेल्या इतरांच्या पासंगालाही तें पुरणार नाही.

ग्रंथकारानें भारतीय प्राचीन धर्मलक्षणाचें पाश्चात्यांच्या धर्मलक्षणाशीं तुलनात्मक विवेचन करून जगांतील कोणत्याही धर्मलक्षणापेक्षा भारतीयांचें धर्मलक्षण उच्चतम, भव्य, श्रेष्ठ, गहन, उदात्त, सूक्ष्म, व्यापक व शाश्वतजीवनमार्गदर्शक आहे असें म्हटलें आहे. परंतु वस्तुतः तें तसें नाहीं हें शास्त्रीबोवांनीं सप्रमाण सिद्ध केलें आहे. ते म्हणतात "हिंदुधर्मांतील विविध उपासना, अनेक देवतासंप्रदाय, नाना धर्मग्रंथ, यांची प्रौढी प्रो. राधाकृष्णन् यांच्यासारखीच लेखकांनी वर्णिली आहे. हिंदुधर्माने अनेक खुळ्या कल्पनांचें रक्षण केलें, अनेक वेड्या समजुती राखिल्या, बहुविध धर्मग्रंथ प्रमाण मानिले, म्हणजे बुद्धीवर अनेक धर्मग्रंथांचीं ओझीं लादलीं, आणि इतर धर्मांनी एकच देव, एकच धर्मग्रंथ, व एकच मुख्य प्रेषित मानल्यामुळे मनुष्याच्या मनावरील भोळ्या भावांचीं व भ्रांतीचीं दडपणें कमी केलीं. ' उपास्यानामनियमः ' इत्यादि गोष्टी म्हणजे हिंदुधर्माचें थोर वैशिष्ट्य नसून पराकाष्ठेचें दौर्बल्य आहे. हा उदारमतवाद नाही, किंवा परमतसहिष्णुता नाही, तर अनेक खुळ्या, भ्रांतिमूलक वेडांशीं झगडण्याचें सामर्थ्य नसल्यामुळे सगळेंच मेंडोळे संभाळण्याची आणि तें लादून घेण्याची दुबळी अवस्था आहे."

या बाबतींत हिंदुधर्माच्या बाजूने एक गोष्ट सांगतां येण्यासारखी आहे. ती अशीं कीं एकच सर्वज्ञ आणि सर्वशक्तिमान ईश्वर मानण्यांत ज्या अडचणी उपस्थित होतात आणि ईश्वरावर क्रूरतेचे, अज्ञानाचे वगैरे आरोप येतात, तसे अनेक देव मानल्याने येत नाहीत. कारण अनेक देव असले म्हणजे त्यांचें आपआपसांत भांडण लावून दिल्याने बऱ्याच गोष्टींचा उलगडा करतां येईल. अर्थात् तो उलगडा देवांच्या इतकाच काल्पनिक असणार, पण तर्कदृष्ट्या अनेक देवांची कल्पना अधिक सयुक्तिक दिसते.

शेवटीं शास्त्रीबोवांनी ग्रंथकाराचा मध्यवर्ती सिद्धांत, म्हणजे समाजधारणा हें मानवजीवनाचें मुख्य सूत्र असलें पाहिजे, हें मान्य केलें आहे. त्यांचें फक्त

म्हणणें की ' लेखकांनी मुख्य सिद्धांताला ज्या सामग्रीची जोड दिली आहे, ती अतिशय पोकळ व निर्माल्यवत् आहे. आधुनिक मानवबुद्धीने उपनिषदें, गीता, महाभारत, पूर्वमीमांसा, इत्यादिकांच्या पुढें फारच मोठा प्रवास केला आहे. त्यापेक्षा ती कितीतरी प्रगल्भ झाली आहे.' आणि हा निर्वाळा एका शास्त्र्याने दिला आहे हें लक्षांत घेण्यासारखें आहे. तुझी **शारदा.**

गृहकर्म

—:०:—

(या सदरांत येणारा मजकूर कोणीं पाठवल्यास सवडीप्रमाणे छापूं. **सं.**)

तुरीच्या डाळीचें सार. डाळ शिजवून, घाटून, नंतर त्यांतील घट्ट भाग पिळून काढून टाकावा, आणि राहिलेलें पाणी फोडणीस टाकावें व त्यांत मसाला घालून निदान वीस मिनिटें उकळूं द्यावें. फोडणींत हिंग, मोहरी, सुकी मिरची व कढीलिंब घालावीं. मसाल्याचे दोन प्रकार पुढे दिले आहेतः—

मद्रासी मसाला. १ चमचा जिरें, १ चमचा मेथी, १ चमचा मोहरी, २ चमचे काळीं मिरीं, २ चमचे धने, हे सर्व जिन्नस निरनिराळे भाजून, मिसळून, बारीक पूड करून बाटलींत घालून, घट्ट बूच लावून ठेवणें, व जरूर पडेल तेव्हा वापरणें. या सारांत आंबटपणासाठी चिंच वापरावी.

कर्नाटकी मसाला. १ चमचा जिरें, १ चमचा मोहरी, १ चमचा मेथी, २ चमचे धने, २ चमचे मिरच्या, हे सर्व जिन्नस तुपांत तळून वरीलप्रमाणे पूड करून ठेवावी व जरूर तेव्हा वापरावी. या सारांत आंबटपणाकरतां उकळी आल्यानंतर लिंबूं पिळावें व फोडणी देऊं नये.

किंवा, वरील मसाला कोरडा भाजून पूड करूनही वापरतात. तसा वापरल्यास सारांत कोकम घालून, फोडणींत हिंग, मोहरी, सुकी मिरची व कढीलिंब टाकून गोड्या तेलाची फोडणी देणें.